महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/२/१०(५)/स.सा.बदल्या-२०२५/०९/२०२५. दिनांक :-०६/०२/२०२५.

**संदर्भ** :- १. महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश क्र.३/२०१४, दिनांक ०१/०२/२०१४, व
२. महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अधिनियम, २०१५ दि.०६/०४/२०१५.

**विषय** :- **सर्व साधारण बदल्या - २०२५ :-**
पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त / सहायक समादेशक (नि:शस्त्र / सशस्त्र / मोटार परिवहन / बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) / वाहतुक इ.) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सार्वत्रिक बदल्या-२०२५ करीता माहिती पाठविण्याबाबत.

* * * * *

संदर्भाधिन अधिसूचनेमधील तरतुदींच्या अधिन राहून **सन-२०२५** साठी पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त दर्जाच्या सर्व संवर्गांतील अधिकाऱ्यांच्या वार्षिक सर्वसाधारण बदल्या करण्याचे प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे घटक कार्यालयांना अवगत करण्यांत येत आहे:-

१. सध्याच्या नेमणुकीच्या पदात **दि. ३१/०५/२०२५ पर्यंत ०२ वर्षे पूर्ण करणार आहेत,** अशा पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्तांकडून बदलीकरिता त्यांच्या ०३ पसंतीच्या ठिकाणांची माहिती घेऊन, सोबत जोडलेल्या **विवरणपत्र-"अ"** मध्ये भरुन संबंधीत घटक प्रमुखांनी ती निश्चितपणे **दि. १५/०३/२०२५** पुर्वी या कार्यालयास पाठवावी. **संबंधित अधिकाऱ्यांनी परस्पर या कार्यालयास अर्ज सादर केल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही.**

२. अधिकाऱ्यांची माहिती विवरणपत्रात भरतांना ती संबंधीतांच्या **सेवापुस्तकांतील प्रमाणित नोंदींनुसार** बरोबर असल्याची निश्चीत खात्री करावी.

३. अधिकाऱ्यांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कलमान्वये गुन्हा दाखल असल्यास, अथवा विभागीय चौकशी सुरु असल्यास ती बाब विवरणपत्रामध्ये स्पष्टपणे नमूद करावी. तसेच, न्यायालयीन प्रकरण / विभागीय चौकशी किंवा एखादे अन्य प्रकरण प्रस्तावित / प्रलंबित आहे किंवा कसे? किंवा सध्या यापैकी कोणी एखादी शिक्षा भोगत असल्यास सदरची शिक्षा केव्हा सुरु झाली, व ती केव्हा संपणार? इत्यादींबाबतचा सविस्तर अहवाल सोबतच्या विवरणपत्रात भरुन पाठवावा.

४. तसेच, संबंधीतांना स्पष्ट कल्पना द्यावी की, पसंतीच्या ठिकाणी प्रशासकीयदृष्ट्या शक्य असेल तरच बदली करण्याकरिता दिलेल्या विकल्पांचा विचार करण्यात येईल.

५. ज्या अधिकाऱ्यांना विनंतीवरुन मुदतपुर्व बदली हवी आहे, त्यांची स्वतंत्र माहिती <u>विवरणपत्र-"ब"</u> मधील रकान्यात योग्य माहिती भरुन, त्यांचे अर्जातील बाबी खऱ्या आहेत किंवा कसे, तसेच **<u>स्पष्ट अभिप्रायासह</u> दि. १५/०३/२०२५** पूर्वी **<u>घटक कार्यालय प्रमुखांच्या मार्फतीने या कार्यालयास विनंती अर्ज सादर करावेत. परस्पर या कार्यालयास विनंती अर्ज सादर केल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही.</u>**

६. तसेच पदोन्नतीने पदस्थापना झालेल्या ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी संवर्ग बाह्य बदलीसाठी विनंती केली आहे, अशा पोलीस अधिकाऱ्यांच्या बाबतीत **शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १४ जुलै, २०२१ मधील तरतुदींनुसार त्यांच्या कार्यरत महसुल विभागात पदोन्नतीवर ०१ वर्ष सेवा पुर्ण झाली असल्याची आणि सदर अधिसूचनेत नमुद वैद्यकीय कारणे व संबंधित कागदपत्रांची खात्री करुनच त्यांची माहिती या कार्यालयास पाठवावी. <u>तसेच परस्पर विनंती बदलीकरिता या कार्यालयास प्राप्त झालेल्या कोणत्याही विनंती अर्जावर या कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात येणार नाही,</u> याची समज सर्व अधिकाऱ्यांना लेखी स्वरुपात देण्याची जबाबदारी संबंधित घटकप्रमुखांची आहे.**

७. **<u>दिनांक ३१/०१/२०२५ पूर्वी या कार्यालयात पाठविलेले सर्व प्रकारचे विनंती अर्ज या परिपत्रकान्वये रद्द समजण्यात येत आहेत.</u>** त्यामुळे सदर अर्जांवर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी व ती बाब संबंधित घटक प्रमुखांनी सर्व पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त यांच्या लेखी स्वरुपात निदर्शनास आणून द्यावी.

८. तसेच खाली नमूद केलेल्या अंतिम तारखेनंतर म्हणजेच **दि.१५/०३/२०२५ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.** याची समज सर्व अधिकाऱ्यांना लेखी स्वरुपात देण्याची जबाबदारी संबंधित घटक प्रमुखांची आहे.

९. सदरची माहिती **DVBW-TTSurekh** मध्येच टंकलिखित करुन, परिपत्रकासोबत संलग्न केलेल्या विवरण पत्राप्रमाणेच योग्य रकान्यात योग्य माहिती नमूद करुन, बिनचूक सेवातपशीलासह **दि.१५/०३/२०२५** पर्यंत या कार्यालयातील **<u>कार्यासन क्रमांक्र ०२ वर ई-ऑफीस प्रणालीव्दारे</u>** तसेच या कार्यालयाच्या **<u>desk2.dgoffice@mahapolice.gov.in</u>** या ईमेलवर पाठवावी, ही विनंती.

**(डॉ. सुखविंदर सिंह)**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म. राज्य, मुंबई (सस्नेह).
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म. राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई /द.वि.प., मुंबई /वाहतुक , मुंबई / आ.गु.शा.,म.राज्य, मुंबई/ प्रशिक्षण व खास पथके, म. राज्य, मुंबई / फोर्स वन, मुंबई.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण माहिती व तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबई सह व बृहन्मुंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / नक्षल विरोधी अभियान, नागपूर/ वि. सु. वि., दादर, मुंबई / महाराष्ट्र सायबर / मा.राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई / ना.ह.सं., म.राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / विशेष सुरक्षा विभाग, दादर-मुंबई / राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई सह)
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये / युओटीसी, नागपूर / डी.टी.एस्., नाशिक.

**प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरीता सस्नेह अग्रेषित :-**

अपर पोलीस महासंचालक, सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस अधीक्षक, अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती आयोग, मुंबई.
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व उपायुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती.
सर्व उप संचालक, जिल्हा जात प्रमाणपत्र समिती.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे १.

**संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई.**

२. सदरचे ज्ञापन **"पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त / सहायक समादेशक (नि:शस्त्र/ बिनतारी संदेश (अभि.)/ वाहतूक/ मोटार परिवहन) या संवर्गाच्या सर्वसाधारण बदल्या-२०२५"** या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील एक महिन्यासाठी प्रसिध्द करावे.

# विवरणपत्र-"अ"

**पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त संवर्गातील अधिकाऱ्यांच्या "सर्वसाधारण बदल्या -२०२५"**

| | | |
|---|---|---|
| १. | नांव :- | |
| २. | सध्याची नेमणूक व कार्यरत दिनांक | |
| ३. | घोषित मूळ जिल्हा :- | |
| ४. | सेवानिवृत्तीचा दिनांक:- | |
| ५. | १. लाचलुचपत प्रतिबंधक कलमान्वये गुन्हा दाखल असल्यास अथवा विभागीय चौकशी प्रलंबित असल्यास त्याबाबतची माहिती<br>२. शिक्षा प्रस्तावित किंवा प्रलंबित असल्यास त्याबाबतची माहिती द्यावी. | |

| पूर्वीच्या नेमणुका (परिपूर्ण व अचूक सेवातपशील) | | | पसंतीची तीन ठिकाणे | घटक प्रमुखांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| घटक | कालावधी | | | |
| | पासून | पर्यंत | | |
| पोलीस उप निरीक्षक | | | १) | |
| सहायक पोलीस निरीक्षक | | | २) | |
| पोलीस निरीक्षक | | | ३) | |
| पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त | | | | |
| | | | (अर्जदाराची स्वाक्षरी) | (घटक प्रमुखाची स्वाक्षरी) |

# विवरणपत्र-"ब"

## पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त संवर्गातील

## अधिकाऱ्यांच्या "विनंती बदल्या -२०२५"

| | | |
|---|---|---|
| १. | नांव :- | |
| २. | सध्याची नेमणूक व कार्यरत दिनांक | |
| ३. | घोषित मूळ जिल्हा :- | |
| ४. | सेवानिवृत्तीचा दिनांक:- | |
| ५. | १. लाचलुचपत प्रतिबंधक कलमान्वये गुन्हा दाखल असल्यास अथवा विभागीय चौकशी प्रलंबित असल्यास त्याबाबतची माहिती<br>२. शिक्षा प्रस्तावित किंवा प्रलंबित असल्यास त्याबाबतची माहिती द्यावी. | |

| पूर्वीच्या नेमणुका (परिपूर्ण व अचूक सेवातपशील) | | | विनंती अर्जाची माहिती | घटक प्रमुखांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| घटक | कालावधी | | | |
| | पासून | पर्यंत | | |
| पोलीस उप निरीक्षक<br><br>सहायक पोलीस निरीक्षक<br><br>पोलीस निरीक्षक<br><br>पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त | | | (अर्जदाराची स्वाक्षरी) | (घटक प्रमुखाची स्वाक्षरी) |